वर्ष तेरावे : अंक १९ : जुलै २०२५



# कॉक्लिआ वार्ता

मुकं करोति वाचालं...

COCHLEA - PUNE
कॉक्लिआ पुणे
श्रवण आणि वाचा विकासासाठी
FOR HEARING & SPEECH

◆ 1998 ◆

# COCHLEA WARTA













Volume Thirteen : Issue 17 : JULY 2025 Total Pages : 16 Rs. 10/-






डॉ.अक्षय वाचासुंदर यांच्याबरोबरच
शिक्षण संचालिका सौ.रक्षा देशपांडे
यांनी पालकांना मार्गदर्शन केले.





# COCHLEA WARTA कॉक्लिआ वार्ता

**वर्ष : १३ वे | अंक : १९**



**संपादक**
डॉ. अविनाश वाचासुंदर

**कार्यकारी संपादक**
सौ. मानसी दाते

**कार्यकारी मंडळ**
मृदुल हेमंत बापट
तृप्ती कोहिनकर
Mr. Ebenezer Harding

**मुद्रण :**
व्यंकटेश प्रिंटर्स, पुणे.

**मुखपृष्ठ व सजावट :**
श्री. संजीव शिंदे


## अंतरंग


**Editorial** ... ०२
- Mrs. Manasee Date

**Listening Beyond Words : Insights from the Cochlea Summer Camp** ... ०३
- Nisha Dighe

**Reunion of our Cochlear Implanted Children** ... ०४
- Mrs. Pallavi Sharma

**मोठ्या मुलांचे निवासी शिबीर भावनिक, वैचारिक स्वातंत्र्याचा अबीर** ... ०७
- सौ. रक्षा देशपांडे

**निवासी शिबीर - एक खास दिवस** ... ०९
- ओमप्रकाश बाबर

**एक अनोखी वाटचाल** ... ११
- श्रीमती शुभदा डांगे

**निवासी शिबीर - गेट-टू-गेदरचे सुयोग्य ठिकाण** ... १२
- सारिका बानारे



| | | |
|---|---|---|
| **Printed & Published by** | : | Cochlea Pune for Hearing and Speech |
| **Owned by** | : | Cochlea Pune for Hearing and Speech |
| **Printed by** | : | Sanjeev V. Shinde<br>Paud Road, Kothrud, Pune. |
| **Published at** | : | Cochlea Pune for Hearing and Speech<br>161-A, Modibaug, Shivsagar Society,<br>Near Mhasoba Gate, Shivajinagar, Pune 411 016. |
| **Editor** | : | Dr. Avinash Madhav Wachasundar |

# EDITORIAL

**- Mrs. Manasee Date**

What a joyful word 'Reunion' is. Yes the past students of Swaranaad had a reunion on 7th and 8th June organised by the teachers and staff of Swaranaad.

I witnessed the pleasure on the faces right from there entry into the campus of our centre at Urawade. They played games, exchanged their experiences, performed in the cultural program and also went for a trek and fooled around with each other. They also listened to some lectures and advise by the seniors. More in detail are the write ups given by Raksha tai and Nisha Dighe. One of the past student, Om Babar, doing engineering, has also given a write up on his experience in the reunion. Another reunion of children with cochlear implant was organised on 13th June in the auditorium of Maharshi Stree Shikshan Sanstha. It was a full day program from 9:00 a.m. to 3:00 p.m. All those who had funded for the cochler implants of these children were invited.

Representatives of Persistent Systems, Rama Purushottam Foundation, MNGL, Vanaj Engineering, Panchsheel and Mukul Madhav Foundation were present. Sri Rao Saheb Suryavanshi and Ravi Dev graced the occasion with their presence in spite of their busy schedule. The students of Swaranaad performed some cultural shows which was appreciated by all. Dr Avinash Wachasundar, Dr Akshay Wachasundar and Mrs Raksha Deshpande, Director (education), guided the parents.

On 16th June all the children were welcomed back in Swaranaad. They were so happy to meet their teachers and were eager to tell them about how they spent their holidays. New classes, new syllabus and the new curriculum made it very exciting for the teachers also. Only the new entries in the nursary were a bit sad. But our teachers are expert in handling them and in a week one will see them happily trotting into their class. 23rd June was celebrated with all the teachers and staff doing yoga for half an hour and the children enjoyed that too.

HAPPY ACADEMIC NEW YEAR TO ALL.

◆◆◆

# Listening Beyond Words : INSIGHTS FROM THE COCHLEA SUMMER CAMP

**Nisha Dighe**
Former, Psychologist and Psychotherapist
Swaranaad, Kothrud

On the 7th and 8th of June, a residential summer camp was organized for the ex-students of Cochlea young individuals with hearing impairment who have grown and evolved through years of learning and therapy. I had the opportunity to conduct a session and interact with them, and the experience turned out to be both heartwarming and thought-provoking.

As I engaged with these adolescents, I observed something deeply moving. Many of them are either entering or already going through adolescence a phase full of emotional shifts, identity questions, and the need for expression. But for them, this journey brings an added layer of complexity. They often have a lot to say, but don't always have the words or the emotional vocabulary to express what they are truly going through. Their silence, pauses, and expressions carried more depth than any spoken sentence could.

This realization shaped the flow of my session. While we engaged in fun, interactive games, the underlying goal was to help them connect with their inner focus, understand their emotions, and learn how to cope with challenges both internal and external. It was essential for them to grasp that being attentive and focused isn't just about academics or tasks it's about building a mindset that supports their overall well-being.

What made the session truly special was the way the children responded. They enjoyed every activity, but more importantly, they participated with a sense of trust and openness. Behind their playful engagement was a desire to learn, to be seen, and to be understood.

This experience left a profound impact on me. It reminded me once again that growing up with hearing impairment doesn't just mean overcoming communication barriers it also means navigating emotional landscapes in a world that doesn't always listen with empathy. And as educators, therapists, and caregivers, we need to create more such opportunities where these children now young adults can explore their feelings, find their voices, and step forward with confidence.

Because sometimes, what matters most is not just hearing their words, but truly listening beyond them.

◆◆◆

# Reunion of our Cochlear Implanted Children

**Mrs. Pallavi Sharma**
Public Relation Officer

Come June and the first thought that crops up areall things related to school. Huge crowd of parents cramped up in stores buying uniforms, school bags,socks, shoes, raincoat and umbrellas.

Well, this June was different! We started the academic session with a different yet important event. We take pride in sharing our Implantee Get Together Event held in the honour of our implanted children and their parents which was held on 13th June, 2025, Friday at Maharshi Karve Stree Shikshan Santha, Karvenagar, from 9:00am till 3:00pm, a day's program filled with presentations, performances, felicitations and of course hot delicious meals.

Once the cochlear implant surgery is done, the child goes home, starts rehabilitation but the journey for the child and parent continues. Our Dr Avinash Wachasundar Sir, did not want to stop just at this, he was the mastermind behind this event, wherein he still wants to be a part of this journey by understanding what the implantee child goes through, be it for the better or difficulties the child and parents face.

A lot of efforts went into ensuring maximum, if not all, our implantee children and their parents attend this event. Considering the fact that we have children coming not only from Pune, but other districts and rural areas as well, keeping in mind the onset of monsoon, were some of the determining factors for attendance.

The event commenced with registration; parents had to fill out the questionnaire with the help of teachers as it was a comprehensive form asking them in detail regarding the implant and the processes thereafter. Each company conducted sessions for an hour and a half with their respective implanted children. Company personnel interacted with the parents addressing their problems, giving them solutions, guided them on wear and tear

and other related issues parents are facing. It was a fruitful session highly appreciated by parents.

Hospitable as we are known for as well, a hot delicious breakfast was served to all the children, parents, company representatives and team members. And not to mention we had T-shirts customized for these implantee children and our team members! What a co-ordinated look we all had!

We had presentations given by our team members from Cochlea Pune and Swaranaad Rehabilitation Center. We started with Dr Akshay giving his insights on cochlear implants, followed by Mrs Mugdha and Mr Amit sharing information from the audiological perspective, Raksha madam and Mrudula madam left no stones unturned to enlighten the audience with their wisdom on the importance of continuity of various therapies and rehabilitation for the hearing-impaired children.

We are always grateful to our donors, namely Persistent Systems, Rama Purshottam Foundation, MNGL, Vanaz Engineering, Panchashil, Mukul Madhav Foundation, it is because of their donations we are able to perform maximum cochlearimplant surgeries andrehabilitate our implanted children. We felicitated these good Samaritans by presenting them photo frames as our token of appreciation and gratitude.

None of our events are complete without the performances of our implanted children. The little ones delighted us with reciting shlokas and poems, narrating stories and singing some rhymes. This gives them a platform to showcase their growth, progress, development and highlights the importance of the rapies and rehabilitation.

The older children who are fifteen years of age and above, some who are in their early twenties, narrated their journey and how they overcame challenges, obstacles and continue to keep striving for the best. They are our role models for the younger generation.

Our Special Guests, Rao Saheb Suryavanshi Sir and Ravi

Deo Sir,were kind enough to spare some of their valuable time and were presentat this event. They were felicitated as well and spoke a few words.

Our Sir, Dr Avinash Wachasundar, wrapped up the event with heartwarming experiences full of inspiration and motivation which resonated with the audience.

After we concluded our significant agendas in the auditorium, a sumptuous lunch meal welcomed all of us in the lobby.

The very fact that the turnout of implanted children and their parents turned up in numbers,what we hoped to achieve at this event was triumphant as it was our very first with this kind of a plan. We managed to have around 170 attendees comprising of implanted children, their parents, implant company representatives and our team members.

We do intend to host this yearly, which will enable us to remain in touch with our implanted children and help them in every possible way in their journey.

◆◆◆

**Your generosity can make a deaf child Speak**

Cochlea is registered under :
BPT 1950 Act.
Society Reg. Act.
PAN No. AAATC5056E

| | | |
|---|---|---|
| Account Name | : | 'Cochlea Pune for Hearing and Speech' |
| Account No. | : | 60040230428 |
| Bank | : | Bank of Maharashtra |
| Branch | : | Shivajinagar, Pune. |
| IFSC Code | : | MAHB0000043 |

**All Donations are exempt under section 80G of the Income Tax Act.**

## मोठ्या मुलांचे निवासी शिबीर भावनिक, वैचारिक स्वातंत्र्याचा अबीर

**रक्षा देशपांडे**
संचालिका, स्वरनाद, पुणे

नमस्कार,

मे महिना म्हटले की सुट्टीचे वारे वाहू लागतात. वर्षभर शाळा, प्रवास, अभ्यास व परिक्षा या चक्रात मुले व पालक अडकलेली असतात. मे महिना म्हणजे हक्काची सुट्टी व पालकांसाठी वर्षभराच्या चक्रातून क्षणभराची विश्रांती. हे चक्र सगळीकडेच आहे. मूल सर्वसामान्य असो अथवा कर्णबधिर मे–जून मध्ये काही वेगळा प्रकल्प करायचा म्हटले की पालकांच्या कपाळावर आठ्या पडतात. पण कॉक्लिआ स्वरनादसाठी मात्र मे शेवट किंवा जूनच्या पहिल्या आठवड्याची सगळे माजी विद्यार्थी आतूरतेने वाट बघत असतात. त्याचे कारणही तसेच आहे. गेली दोन वर्षे आम्ही माजी विद्यार्थ्यांचा मेळावा ह्या दिवसांमध्ये घेतो. गेली २७ वर्षे काम चालू आहे. मागच्यावर्षी सहज विचार आला अगदी पहिल्या म्हणजे १९९८ च्या पुढच्या ४ ते ५ वर्षांतील मुले आता मोठी झाली आहेत. बरीचशी नोकरी करतात. तसेच काहीं पदवीचे शिक्षण घेत आहेत. तसेच काही पदवीच्या पुढचे शिक्षण घेत आहेत. काही १२ वी मध्ये शिकत आहेत. या सगळ्यांना जर आपण एकत्र केले तर ते आता काय विचार करत आहेत. त्यांना कोणत्या समस्या आहेत, शिक्षण तसेच समाजात मिसळण्यात काही अडचणी येत आहेत का? त्यांचे मानसिक स्वास्थ्य बरे आहे ना? घरातील इतर व्यक्तींबरोबरचा संवाद कसा चालू आहे? पालकांबद्दलचा त्याचा दृष्टिकोन काय आहे? पुढे भविष्याचा विचार केला आहे का? एकूणच आपण बोलण्यासाठी तयार केलेले मूल व आता इतक्या वर्षानंतर त्याच्यात झालेले बदल, त्याला वाटणाऱ्या अडचणी आपण सोडवू म्हणण्यापेक्षा समजावून घेणे, हा त्यामागचा हेतू होता. खरंतर मागच्या वर्षी ही मुले खरंच आपली सुट्टी, परीक्षा, कामावरुन रजा घेऊन येतील की नाही याबद्दलच साशंकता होती. पण अतीशय आनंदाची गोष्ट म्हणजे खूप उत्तम प्रतिसाद या उपक्रमाला मिळाला. कॉक्लिआतील समाजसेविका व समुपदेशक यांनी खूप सक्रीय सहभाग या उपक्रमात घेतला. अर्थातच शिक्षकांचीही साथ लाभली.

कुठलेही शिबीर म्हटले की त्याचे तीन भागात विभाजन होते. शिबीरापूर्वीची तयारी, शिबीर चालू असतानाची व्यवस्था, शिबीर झाल्यावर त्यांची सांगता. पूर्व तयारीमध्ये मुलांचा व्हॉट्स ॲप ग्रुप तयार करुन त्यावर माहिती टाकणे सुरू झाले व उत्तम प्रतिसाद मिळाला. आता प्रश्न होता जागेचा. २०२२ पासून उरवडेच्या माता–बालक निवासी प्रशिक्षणाची सुरुवात झाली व निवासी शिबीरासाठी उत्तम जागा मिळाली. संस्थेचाच पहिला विद्यार्थी ऋषिकेश पाटील हा आमचा उत्साही कार्यकर्ता आहे. त्याने लगेच मुलांसोबत संवाद साधण्यास सुरुवात केली. कोण कुठून येईल... तसेच दोन दिवसांचे टाईमटेबल तयार करणे. त्यात मुलांना शैक्षणिक माहिती तर मिळेल. त्याबरोबरीने शारिरीक व्यायाम तसेच विविध कलागुण दर्शन व जेवणाचा बेत इ. सगळे

नियोजन सगळ्यांनी मिळून छान पार पाडले. अर्थातच जातांना सगळ्यांना खूप वाईट वाटत होते. दोन दिवसां ऐवजी अजून १० दिवसांचे शिबिर करता येईल का? अशी विचारणा मुलांनी केली. तसेच feedback form भरून घेतले. त्यात त्यांना अशा शिबिरांची गरज आहे, हे लक्षात आले. यापुढीलवर्षी म्हणजे २०२५ च्या जूनच्या पहिल्या आठवड्यात शिबीर घेण्याचे ठरले. त्यात एक अट होती. २०२४ चे शिबीर निःशुल्क होते. आता मात्र सगळ्यांनी रूपये ५००/- जमा करावे म्हणजे शिबीराच्या खर्चाचे ओझे संस्थेवर पडणार नाही. मुलांनापण अजून जास्त चांगल्या सुविधा, व्याख्याने घेता येतील. त्यातून हा खर्च केला जाईल. मुख्य म्हणजे कोणतीही गोष्ट फुकट न घेता त्यासाठी आपण काही दिले पाहिजे ही भावना जागृत व्हावी हा हेतू होता. अर्थातच पैसे कमवण्याची किंवा (पैसे भरण्यासाठी) एक अट होती. रूपये ५००/- हे वर्षभरात स्वतः कमवायचे होते. काही व्यवसाय किंवा काही काम करून अथवा जी मुले १० वीत आहेत त्यांनी आपल्या घरातील कामातून मिळालेले पैसे भरावे. सगळ्या मुलांनी आनंदाने त्याला होकार दिला. सगळी घरी गेल्यावर दोनच महिन्यात आमचे ५०० रुपये जमले आहेत. दिवाळीत शिबीर घ्यायचे का? असे विचारु लागले. या विचारण्यात अशा उपक्रमाची किती उत्सुकता आहे हे दिसून येते. यावर्षी २०२५ मध्ये जून ७ व ८ ला शिबीर घेण्यात आले. या वर्षी मुलांचा उत्साह दुणावला होता. काही नवीन मुले आली होती. दोन दिवस भरभरून पूर्णवर्षभराचा ऑक्सिजन घेऊन आपआपल्या घरी गेली. जातांना प्रत्येकालाच भरून आले होते. मुलगी सासरी जाण्याची भावना सगळ्यांच्या मनात होती. सगळ्यांनी पुढील वर्षी २०२६ मध्ये परत भेटण्याचे ठरवून निरोप घेतला. ऋषिकेशने ह्या सगळ्यांचे चित्रांकन केले. खूप छान व्हिडिओ बनवला. सगळ्या कर्मचाऱ्यांनी ऑफिस, शिक्षक, मावशी, स्वयंपाकी यांनी खूप छान काम केले. त्यांना खूप खूप धन्यवाद...

आता मातांसाठी शिबीर घेण्याचा आग्रह चालू आहे. बघूयात कसे जमते ते..!

◆◆◆

**निवासी शिबिर २०२५**



## निवासी शिबीर – एक खास दिवस

**ओमप्रकाश बाबर**
माजी विद्यार्थी – स्वरनाद

नमस्ते, मी ओमप्रकाश बाबर, मी तुम्हाला उरवडे केंद्र २०२५ याबद्दल थोडक्यात अभिप्राय देणार आहे, तर या केंद्रावर दोन दिवसांसाठी (७ व ८ जून २००९) सत्र होते, पण त्याआधी मी असा विचार केला की आपण स्वतः कुठेतरी मोकळ्या जागी शांततेत वातावरणात थोडा वेळ घालवला तर खूप बरे वाटेल... नाही का? तेवढीच त्याकालावधीत आपल्या मनाला व शरीराला लवचिकता व उर्जा मिळेल. नाही तर काय नेहमीचे कंटाळवाणा दिनक्रम... घर–शाळा–काम... वगैरे. बरं... चला तर उरवडे केंद्रावरच्या खास दिवसाबद्दल... विशेष म्हणजे मी गेल्यावर्षीच्या उरवडे केंद्रावर या सत्रानिमित्त नव्हतो गेलो. पण यावर्षी मात्र मुद्दाम वेळ काढून जावं, सगळ्यांना भेटावं असं वाटले म्हणून ठरवून तिथे गेलो. त्याप्रमाणे तिथं सारे जुने मित्र भेटले.

लहानपणी मी स्वरनाद शाळेत ४–५ वर्षे वाचा प्रशिक्षणास जायचो. त्यामुळे वाचायचे, बोलायचे शिक्षण मिळाले. पुढे मी सर्वसामान्य (normal) शाळेत जाऊ लागलो. तेव्हा सर्व विषय चांगल्याप्रकारे समजू लागले. तसेच खुपश्या शाळेतल्या कार्यक्रमांत सहभाग घेतला. इयत्ता १० मध्ये मला ९४ टक्के गुण मिळाले आणि १२ वी मध्ये ८० टक्के गुणांनी मी उत्तीर्ण झालो. त्यानंतर त्या अगोदर मला अभियांत्रिकी विश्वविद्यालयात (Engg. College) मध्ये प्रवेश मिळाला त्यासाठी त्या अगोदर प्रवेश परिक्षा दिल्या. त्यात CET, JEE - (MAIN-ADV.) मुख्य यासारख्या परिक्षा होत्या. मला PCCOE आकुर्डी या पुण्यातील नामवंत अभियांत्रिकी विश्वविद्यालयात प्रवेश मिळाला आता माझे अंतिम सत्र – गणकयंत्रशास्त्र अभियांत्रिकी (Computer Science Engineering) चालू झाले आहे.

तर आता तिकडे यावर्षीही गेल्या वर्षीप्रमाणेच आमच्यासाठी सर्वांच्या प्रिय, आवडत्या रक्षा दीदींनी पुन्हा जमायचे ठरवलं. मी गेल्या वर्षी नव्हतो पण जेव्हा यावर्षी मी पहिल्यांदाच आलो आहे तेव्हा खूपच उत्साहवर्धक व ताजेतवाने वाटले.

सत्रामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे खेळ, कार्यक्रमांत चर्चासत्र होती. तसेच मान्यवरांचे विचार ऐकता आले. त्या सत्रांत वेगवेगळ्या कार्यक्रमातून मार्गदर्शन करणारी विविध व्याख्याने होती. प्रथम आम्ही काही खेळ खेळलो. त्यानंतर आमच्यासाठी वेगळे नवीन कल्पना सुचविणारे उपक्रम योजिले होते. अभ्यासक्रमांत समाविष्ट केलेले अभ्यास व सध्या असलेले वस्त्राभाषांतील नवीन कल्पना व व्यवस्थापनाची महिती विविध भाषांमधून आम्हाला झाली.

पहिल्या दिवशी पूर्वसंध्येला श्री. मिलिंद साठे यांचे (online) व्याख्यान होते. त्यामध्ये आई–वडील यांचे शिस्तपालन कसे करायचे ते त्यांनी सांगितले नंतर सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रम त्यामध्ये त्यावेळी मुलामुलींनी विविध नृत्यप्रकार सादर केले. काही जणांनी त्यांची माहिती सांगितली. त्यानंतर पुन्हा काही खेळ झाले. रात्रीच्या

जेवणानंतर राजेश आपटे सरांचे अतिशय महत्त्वाचे असे जीवनावश्यक, व्याख्यान होते. त्यामुळे आचार–विचार, भ्रमणध्वनीच्या पगड्यापासून मुक्ती या मुद्यांवर भर होता.

दुसऱ्या दिवशी लवकर उठून, ताजे तवाने होऊन सकाळी निसर्गपरिभ्रमण करून निसर्गसान्निध्यात चांगला वेळ गेला. त्यामुळे मला खूप उत्साहित व आनंदी वाटले. अनेकांसोबत घालवलेला हा वेळ खूप काही सकारात्मक गोष्टी सांगून गेला.

त्यानंतर शेवटच्या सत्रांत निशा दीदींनी मेंदूला चालना देणारा खेळ घेतला. त्यानंतर दीदींनी दिलेले एकंदर कार्यक्रमांचा अनुभव सांगणारे परिपत्रक आम्ही भरले.

अशा प्रकारे उरवडे केंद्रावरील दोन दिवसांचा भरगच्च कार्यक्रम, खेळ व विविध उपक्रमांमुळे सगळ्यांसोबत एकत्रितपणे घेताना खूप मजा आली व अनुभव मिळाला. त्यातून मला स्वतःला खूप उर्जा मिळाली ती पुढच्या संपूर्ण वर्षासाठी उपयुक्त ठरेल.

त्यातुन जुन्या मित्र–मैत्रिणींना व शिक्षकांना भेटल्याने उजाळा मिळाला त्यामुळे मला हे चर्चासत्र खास वाटले. मला तर वाटतं असा उपक्रम अधिक तीन दिवसांचा असावा.

धन्यवाद...!

प्रिय रक्षा ताई व स्वरनाद शाळेला.

◆◆◆

**निवासी शिबिर २०२५**



## एक अनोखी वाटचाल

**श्रीमती शुभदा डांगे**
लेखिका आणि कवयित्री – चिंचवड गांव

आज अचानक फोन आला. मनीषाचे लग्न ठरले म्हणून आनंद झाला. मनीषा आमच्या शेजारी राहणारी मुलगी. अतिशय हुशार, गुणी, शिकलेली, नवराही तसाच हुशार, शिकलेला तिला साजेसा मिळाला. एकूण अतिशय आनंदी आनंद गडे अशी मनिषाची स्थिती होती. म्हणता म्हणता लग्नाची तारीख येऊन ठेपली व लग्नसोहळा आनंदात पार पडला. नवे नवलाईचे दिवस हिंडण्या–फिरण्यात गेले आणि एक दिवस बाळाची चाहूल लागली मग काय मनिषाच्या आनंदाला पारावारच राहिला नाही आणि नऊ महिन्यांनी तिने एका सुंदर बाळाला जन्म दिला. पण बाळ वर्षाचे होत आले तरी कोणत्याही आवाजाला प्रतिसाद देत नाही हे तिच्या लक्षात आले, तिच्या पायाखालची जमीन सरकली. डोळ्यांसमोर दाट अंधार पसरला, न जाणे बाळ कर्णबधिर तर नाही ह्या विचाराने डोळ्यातून अश्रू येऊ लागले पण भगवंताची लीला अगाध आहे. तिला लवकरच पुणे येथील स्वरनाद ही संस्था अश्या कर्णबधिर मुलांसाठी कार्यरत आहे हे समजले आणि ती लगेचच बाळाला तिथे घेऊन गेली. तेथील संचालिका सौ. रक्षा देशपांडे यांच्याशी संपर्क साधला. त्यांनी देखील सर्व माहिती तिला पुरवली. बाळाला घेऊन ३ वर्षे येथे राहून आपल्या बाळात तिने बदल बघितला, बाळ तेथील शिक्षिका आणि तिच्या प्रयत्नांमुळे बोलायला लागले होते. दाट अंधारात आशेचा किरण दिसला, मुल शाळेत जाऊ लागले, बोलू लागले. आज तो मुलगा इंजिनिअर होऊन मोठ्या कंपनीत चांगल्या पदावर आहे. यापेक्षा वेगळा आनंद आईला कोणता असतो?

१९९८ साली कॉक्लिआ पुणे फॉर हिअरिंग ॲण्ड स्पीच ही सेवाभावी संस्था स्थापन झाली. त्यानंतर कर्णबधीर बालकांची स्वरनाद ही पूर्व प्राथमिक शाळा स्थापन झाली. चिंचवड येथील मोरया हॉस्पिटल, उरवडे आणि कोथरूड येथे त्यांच्या शाखा आहेत. आम्ही उरवडे येथील शाळेत जाऊन आलो आणि मनाला आनंद झाला. तेथील चिमण्या मुलांचा किलबिलाट ऐकून खूप छान वाटले. एका आईला आपल्या मुलाचे बोलणे ऐकून किती आनंद होत असेल हे अवर्णनीय आहे. खरतर सौ. रक्षा देशपांडे, माझी नणंद आहे. आज आम्हाला तिचा खूप अभिमान आहे. एक स्त्री म्हणून पाहिले तर घरातील सर्व व्याप आणि मुलांना सांभाळून त्यांनी यशाचे शिखर गाठले आहे. अर्थात मोरया मधील डॉ. वाचासुंदर सर आणि कुटुंबातील सर्वांचे त्यांना खूप सहकार्य मिळाले यात संशय नाही. आज त्या कॉक्लिआ, पुणे येथे शिक्षण संचालिका आणि उरावडे येथे निवासी पुनर्वसन केंद्राच्या संचालिका म्हणून काम पाहतात. त्यासाठी त्यांना अनेक वेळा बाहेरगावी जावे लागते पण मुलांना सर्व सोयी–सुविधा मळाव्यात आणि त्यांच्या प्रगतीत अडथळा येऊ नये, कर्णबधीर मुलांना बोलते करण्याची जिद्द ठेवून ही यशाची धुरा अतिशय व्यवस्थित सांभाळली आहे. लहान वयात एवढे यशाचे शिखर गाठणे ही सोपी गोष्ट नाही. अशीच उत्तरोत्तर प्रगती संस्थेची होवो हीच भगवंताच्या चरणी प्रार्थना.

◆◆◆

## निवासी शिबीर – गेट-टू-गेदरचे सुयोग्य ठिकाण

सारिका बानारे, पालक – उरवडे

माझा मुलगा ओम अशोक बानारे आणि मी, त्याची आई सारिका बानारे, ओमचे शिबिरात गेलेले आनंदाचे दोन दिवस – ७ जून व ८ जून.

माझा मुलगा नुकताच दोन दिवसांसाठी उरवडे येथे कॅम्पला गेला होता. विशेश म्हणजे तो त्याच्या बालपणीच्या जिवलग मित्रांसोबत होता – जे अनेक वर्षांनी एकत्र भेटले! माझ्या मुलाचे कॉक्लीअर इंप्लांट झाले आहे. आता तो १० वी मध्ये शिकत आहे. लहानपणी तो स्वरनाद शाळेत ५ वर्षे Speech Therapy घेऊन शिक्षण पूर्ण करून तो नॉर्मल शाळेत जाऊ लागला. गेल्या वर्षीप्रमाणे आमच्या मुलांच्या व पालकांच्या प्रिय, आवडत्या आणि लाडक्या रक्षा मॅडम यांनी मुलांचा कॅम्प घ्यायचा ठरवला. गेल्या वर्षीदेखील झालेल्या कॅम्पप्रमाणे या वर्षी त्यांनी २ दिवस कॅम्प घेतला. या पूर्नभेटीने ओम खूपच उत्साहित आणि आनंदित झाला होता.

कॅम्पमध्ये विविध प्रकारचे खेळ घेण्यात आले. एकमेकांच्या जुन्या आठवणी मित्रांसोबत आणि रक्षा मॅडम सोबत शेअर करण्यात आल्या. डान्स, चेसबोर्ड, क्रिकेट असे खेळ खेळले गेले.

दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठून ट्रेकिंगला म्हणजेच निसर्गाच्या सानिध्यात वेळ घालवला. त्यांचे चेहऱ्यावरचे हास्य, आनंद, मस्ती, गोंधळ आणि एकमेकांसोबत घालवलेला वेळ हे सर्व त्यांच्या मैत्रीला नवसंजीवनी देणारे ठरले. मुलांसाठी रक्षा मॅडम आणि इतर सर्व शिक्षकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

ओम घरी परतल्यावर त्याच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहून मला खूप समाधान वाटले. दोन दिवसांच्या कॅम्पमध्ये त्याने जे मित्र-मैत्रिणी, टिचर्स आणि मॅडम यांच्या सोबत राहून अनुभवले ते त्याच्या आयुष्यात कायमची आठवण बनून राहिल. जुन्या मैत्रीला आणि आठवणींना नव्याने उजाळा मिळाला आणि यामुळेच हा कॅम्प अधिक खास ठरला.

धन्यवाद...!!!

प्रिय रक्षा मॅडम आणि स्वरनाद शाळा...

◆◆◆



होय ! प्रत्येक कर्णबधिर मूल बोलेल

## आग्रहाचे निमंत्रण

कॉक्लिआ पुणे फॉर हिअरिंग अँड स्पीच आणि
पुणे महानगरपालिका यांच्या
संयुक्त विद्यमाने संचलित

## "स्वरनाद पुनर्वसन केंद्र" ,कोथरूड

आयोजित

## विद्यारंभ कार्यक्रम

**वय वर्ष ६ पर्यंत वाचा भाषा प्रशिक्षण पूर्ण करून पहिलीमधे सर्वसामान्य शाळांमध्ये समावेशित झालेल्या**

## कर्णबधिर विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ

**आणि**

## पालक प्रशिक्षण प्रमाणपत्र वितरण सोहळा

**शुक्रवार, ११/०७/२०२५**

वेळ: **दु. १२:०० ते दु. ३:००**

**स्थळ :**

पंडित जवाहरलाल नेहरू ऑडिटोरीयम, महात्मा फुले म्युझियम जवळ,
घोले रोड, पुणे

## SWARANAAD REHABILITATION CENTER
### Monthly Achievement - JUNE 2025

| Sr. No. | FACILITIES | SESSION / STUDENT COUNT |
|---|---|---|
| 1. | Speech Therapy Sessions | 91 |
| 2. | No. of Student getting Speech Therapy | 40 |
| 3. | Aided Audiogram Testing | --- |
| 4. | No. of Speech Assessment | --- |
| 5. | No. of Counseling Sessions | 7 |
| 6. | Individual Occupation Therapy Sessions | 8 |
| 7. | Group Occupational Therapy Sessions | 1 |
| 8. | Psychological Assessment | --- |
| 9. | No. of students getting Individual OT | 23 |
| 10. | No. of OT Screening | 19 |
| 11. | No. of Activity Therapy Session | 15 |

## SWARANAAD OUTREACH CENTER
### Monthly Achievement - JUNE 2025

| Sr. No. | CENTERS | THERAPY SESSION |
|---|---|---|
| 1. | Khed | 3 |
| 2. | Narayangoan | 35 |
| 3. | Pimpari | 40 |
| 4. | Chinchwad | 57 |
| 5. | Phonda | 58 |
| 6. | Porvorim | 51 |
| 7. | Manchar | 72 |
| 8. | Daund | 19 |
| 9. | Urawade (Residential) | 54 |
| 10. | Kudal | 49 |

# होय! प्रत्येक कर्णबधिर मूल बोलेल..

**कॉक्लिआ पुणे फॉर हिअरिंग ॲण्ड स्पीच**

**स्वरनाद कर्णबधिर बालकांचे पुनर्वसन केंद्र**

## निवासी केंद्राची वैशिष्ट्ये

**प्रवेश चालू २०२५-२६**

१. २५ कर्णबधिर मुले आणि त्यांची माता यांची निवास व्यवस्था
२. दृश्य आणि क्रियाकलाब आधारित
३. शिक्षणावर विशेष भर देऊन पूर्व प्राथमिक शिक्षण
४. जवळपासच्या गावातील कर्णबधिर मुलांसाठी बालवाडी
५. भोजन व्यवस्था दालन – ५० जणांसाठी
६. लवकर निदान आणि हस्तक्षेप
७. बालक पालक कार्यक्रम
८. वाचा भाषा प्रशिक्षण (० ते ६) वयोगटातील मुले
९. नियमित वाचा भाषा विकास मूल्यांकन श्रवण तज्ज्ञांकडून श्रवण चाचणी
१०. पालक प्रशिक्षण कर्णबधिर मुलांना मार्गदर्शन करण्यासाठी त्यांच्या मातांना सक्षम करणे.
११. विशेष शिक्षकांचे प्रशिक्षण

: संपर्कासाठी :

**9923289844 / 9822094940**

**HTTPS://COCHLEASWARANAAD.ORG/**

**पुसाळकर स्वरनाद माता बालक निवासी पुनर्वसन केंद्र**
**उरवडे, तालुका मुळशी, जि. पुणे.**

## संस्थेची केंद्र

**'स्वरनाद' कर्णबधिर बालकांचे बहुआयामी अपंग पुनर्वसन केंद्र**
बिंदू माधव ठाकरे दवाखाना,
गोसावी वस्ती समोर, हॅप्पी कॉलनी रोड,
कोथरूड, पुणे – ४११ ०३८.
**संपर्क : रक्षा देशपांडे ९९२३२८९८४४**
**मृदुला देवळाणकर ८५५०९१२९७७**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, चिंचवड**
मोरया मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल,
पिंपरी–चिंचवड लिंक रोड, पी.एम.टी.
शेवटच्या बसस्टॉप समोर, चिंचवडगाव,
पुणे – ४११ ०३३. **फोन : ९८२२६७१८४०**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, खेड**
डॉ. खडके गेस्ट हाऊस,
राजगुरुनगर बाजारपेठ, ता. खेड, पुणे.
**फोन : ९८५०७३८२७६**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, नारायणगाव**
डॉ. खैर जीवन मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल,
नारायणगाव जुन्नर रोड, पुणे.
फोन : ९७६६२६२३२७

**'स्वरनाद' कर्णबधिर बालकांची पूर्व प्राथमिक शाळा, पर्वरी–गोवा**
अनघा, प्लॉट नंबर १५, पी.डी.ए. कॉलनी,
पर्वरी बार्देश, गोवा – ४०३ ५२१.
**फोन : ९६२३७०१०२०**

**श्री शारदा ग्रंथ प्रसारक संस्था, सांचालित स्वरनाद कर्णबधिर मुलांसाठी पूर्व–प्राथमिक विद्यालय**
एफ–४, पहिला मजला, पै हाऊस सदन,
फौंडा, गोवा – ४०२ ४०१.
**फोन : ९६२३७०१०२०**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, पिंपरी**
वाय.सी.एम. हॉस्पिटल,
(पिंपरी–चिंचवड पालिकेच्या संयुक्त विद्यमाने) पिंपरी.
**फोन : ८०८७२२९९५४**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, दौंड**
शालीमार चौक, आनंद अपार्टमेंट,
'सी' विंग, फ्लॅट नं.२,
फॉरेस्ट ऑफिस समोर, ता. दौंड, पुणे.
**फोन : ७०४०६६८०७१/८६६८८३१२११**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, मंचर**
डॉ. तोडकर हॉस्पिटल, पिंपळगाव फाटा,
मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे.
**फोन : ८४५९०१९६०२**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, कुडाळ**
लायन्स सेवा संकुल कुडाळ, अभिनवनगर,
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.
**फोन : ९४०५९९८९८९**

**'पुसाळकर स्वरनाद' माता बालक निवासी पुनर्वसन केंद्र**
माँटवर्ट विस्टा समोर, सर्वे नं. ४२५,
उरवडे, पिरंगुट, ता. मुळशी,
पुणे – ४१२ ११५.
**फोन : ८३०८८३२१४५**











# केंद्राचा पहिला दिवस





RNI No. : MAHBIL/2013/59067
SDM/PUNE/SR/21/2015
Registration No. : PCW/195/2023-25

Published and Posted on 10th JULY, 2025
Posted at Model Colony PSO, Pune 411 016
on 10 of each month.

# 'जागतिक योग' दिवस









**Address :**

**To,**